"माझी वसुंधरा" अभियान
दिनांक २ ऑक्टोबर,२०२० ते ३१ मार्च, २०२१ य
कालावधीत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये
राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
**शासन निर्णय, क्रमांक : अभियान-२०२०/प्र.क्र.१३४/तां.क.-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२०

प्रस्तावना:

निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी, निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या पंचतत्वांवर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे. **पृथ्वी** तत्वाशी संबंधित वनीकरण, वनसंवर्धन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन व जमिनीचे धुपीकरण इत्यादी बाबींवर कार्य करणे. **वायू** तत्वाचे संरक्षण करता यावे म्हणून हवेच्या गुणवत्तेसाठी वायूप्रदूषण कमी करुन हवेच्या गुणक्तेत सुधारणा करणे. **जल** तत्वाशी संबंधित नदी संवर्धन, सागरी जैव विविधता, जलस्त्रोतांचे संवर्धन व संरक्षण तसेच, सागरी किनारे यांची स्वच्छता करणे. **अग्नी** तत्वाशी संबंधित ऊर्जेचा परिणामकारक वापर, ऊर्जा बचत तसेच ऊर्जेचा अपव्यय टाळणे या बाबींना प्रोत्साहन देणे, अपारंपरिक ऊर्जेच्या निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, पडीक जमिनी, शेतांचे बांध या सारख्या जागांवर राबविणे आणि **आकाश** या तत्वास स्थळ व प्रकाश या स्वरुपात निश्चित करुन मानवी स्वभावातील बदलांसाठी जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमानसात बिंबवणे या प्रमुख बाबींचा समावेश आहे. निसर्गाच्या या पंचतत्वासोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैव विविधतेचेही अस्तित्व राहणार नाही. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेवून तेथे या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपूरक जीवनपध्दती अवलंबिण्यासाठी **"माझी वसुंधरा"** हे अभियान राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा" अभियान** हे राज्यातील खाली नमूद केलेल्या ६६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये **दिनांक २ ऑक्टोबर,२०२० ते ३१ मार्च, २०२१ या सहा महिन्यांच्या कालावधीत राबविण्यास शासन मान्यता देत आहे.**

(अ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ३९५ (सूची "*परिशिष्ट-१*" मध्ये नमूद केल्यानुसार)

| | | |
|---|---|---|
| (१) | अमृत शहरे | ४३<br>(महानगरपालिका २७ व 'अ' वर्ग नगरपरिषदा १६<br>"*परिशिष्ट-१*(अ)" |
| (२) | नगरपरिषदा | २२६ "*परिशिष्ट-१*(ब)" |
| (३) | नगरपंचायती | १२६ "*परिशिष्ट-१*(क)" |

(आ) (ब) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : (ग्राम पंचायती) : २७२ (सूची "*परिशिष्ट-२*" मध्ये केल्यानुसार)

| | | |
|---|---|---|
| (१) | सन २०११च्या जनगणनेनुसार १०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती. "*परिशिष्ट-२*(अ)" | २४६ |
| (२) | रायगड, रत्नागिरी व गोंदिया या जिल्हयांमध्ये १०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती नसल्याने या जिल्हयांसाठी सदर अट शिथील करून या जिल्हयांमधील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायतीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे. "*परिशिष्ट-२* (ब)" | २६ |

२. **संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबं आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत व ग्रामसेवक, ग्राम पंचायत य राहील. तर,जिल्हयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्ह जिल्हाधिकारी, जिल्हयाच्या ग्रामीण संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यका अधिकारी व संबंधित महसूली विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विभागातील जिल्हयातील स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांच्याकडून सदर अभियानात उच्चत्तम कामगि करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.**

३. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल् विगतवारीनुसार १५०० गुण ठेवण्यात आले आहेत:-

| विषय | पृथ्वी / Earth | वायू / Air | जल / Water | अग्नी / Energy | आकाश / Enhancement |
|---|---|---|---|---|---|
| गुण | ६०० | १०० | ४०० | १०० | ३०० |
| | एकूण गुण : १५०० | | | | |

उपरोक्त पंचतत्वांतर्गत राबवावयाच्या उपक्रमांचा विस्तृत तपशील खालील तक्त्यात नमूद केला आहे:

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण |
|---|---|---|
| I | पृथ्वी | |
| १ | हरित अच्छादन आणि जैवविविधता | |
| (अ) | अर्जदारांतर्फे राबविण्यात येणारे वृक्षारोपण अभियान : लावलेल्या झाडांची एकूण संख्या | १०० |
| (ब) | वृक्षारोपण अभियान कालावधीत लावण्यात आलेल्या भारतीय प्रजातीच्या झाडांची टक्केवारी | ५० |
| (क) | नव्याने केलेल्या हरित क्षेत्रांचा विकास (संख्या) (उदा. अमृत वने, सार्वजनिक उद्याने) | १०० |
| (ड) | जुन्या आणि नव्याने निर्मित केलेल्या हरित क्षेत्रांचे संवर्धन आणि देखभालीसाठी घेतलेल्या उपक्रमांची संख्या (जैवविविधतेच्या संवर्धनासह) | ५० |
| | एकूण | ३०० |
| २ | घनकचरा व्यवस्थापन | |
| (अ) | घनकचऱ्याचे संकलन, विलगीकरण व शास्त्रोक्त प्रक्रियेची टक्केवारी | १०० |
| (ब) | जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया | ७५ |
| (क) | स्वयंपाकघरातील ओला कचरा कंपोस्टिंग करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण उपक्रम | ७५ |
| (ड) | शहराचा हागणदारीमुक्तीचा दर्जा | २५ |
| (इ) | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | २५ |
| | एकूण | ३०० |
| | पृथ्वी -एकूण | ६०० |
| | | |

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण |
| --- | --- | --- |
| II | वायू | |
| (अ) | पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालयाने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळांमार्फत परिक्षण करण्यात आलेली वायू गुणवत्ता | ४० |
| (ब) | धूळ कमी करण्यासाठी रस्त्याच्या बाजूच्या जागेचे हरितीकरण | २० |
| (क) | ऊज्वला योजनेची व्यापकता (ग्रामीण) | ४० |
| (ड) | नागरी भागात नॉन मोटराइझ वाहतूकीस प्रोत्साहन (नागरी) | ४० |
| | वायु- एकूण | १०० |
| | | |
| III | जल | |
| १ | जलसंवर्धन | |
| (अ) | जलसंवर्धनासाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम | १०० |
| | एकूण | १०० |
| २ | रेन वॉटर हारवेस्टिंग व परकोलेशन | |
| (अ) | हाती घेण्यात आलेली रेन वॉटर हारवेस्टिंगची कामे | १०० |
| (ब) | रेन वॉटर परकोलेशनसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम | ५० |
| | एकूण | १५० |
| | | |
| ३ | नदी, तळे व नाले यांची स्वच्छता | |
| (अ) | नदी, तळे व नाले यांचे पुनःजिविकरण/ सौंदर्यीकरणासाठी हाती घेण्यात आलेले उपक्रम | ५० |
| | एकूण | ५० |
| | | |
| ४ | सांडपाणी, मैला व्यवस्थापन व प्रक्रिया | |
| (अ) | मैला प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया करण्यात येत असलेल्या सांडपाण्याचे प्रमाण | ५० |
| (ब) | मैला प्रक्रिया केंद्राच्या उभारणीसाठी प्रस्तावित मंजूर प्रकल्प | ५० |
| | एकूण | १०० |
| | जल -एकूण | ४०० |

| अ.क्र. | अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी | गुण |
|---|---|---|
| IV | अग्नी | |
| (अ) | नूतनीकरणयोग्य उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन | ३० |
| (ब) | एकूण सौरउर्जेवर चालणारे / एलईडी चालणारे दिवे | २० |
| (क) | पुर्ननवीकृत ऊर्जा म्हणून बायोगॅस प्रकल्पांची उभारणी **(ग्रामीण)** | २५ |
| (ड) | एकूण सौर पंपांची संख्या **(ग्रामीण)** | २५ |
| (इ) | हरीत इमारतींची संख्या **(नागरी)** | २५ |
| (ई) | विद्युत वाहनांना प्रोत्साहन- चार्जिंग पॉईंट उपलब्ध करून देणे **(नागरी)** | २५ |
| | **अग्नी -एकूण** | १०० |
| V | आकाश | |
| १. | **पर्यावरण सुधारणा व संरक्षणासाठी जनजागृती** | |
| (अ) | पर्यावरण सुधारणा व संरक्षणासाठी जनजागृतीसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम | १५० |
| २. | **निर्सग संवर्धानासाठी नागरीकांनी घेतलेली शपथ** | |
| (अ) | हरित कायदा (Green Act) चे पालन करण्याची शपथ घेतलेल्या नागरिकांची संख्या | १५० |
| | **आकाश- एकूण** | ३०० |
| | **एकंदरीत एकूण** | १५०० |

(वरील विगतवारी नुसार गुणांचे सविस्तर वितरण व मुल्यांकन या बाबतची कार्यपध्दती (Toolkit) वेगळयाने निर्गमित करण्यात येईल)

४. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या कामाचे मुल्यमापन दिनांक १ एप्रिल, २०२१ ते ३१ मे, २०२१ या कालावधीत त्रयस्त यंत्रणे मार्फत करण्यात येईल व त्याचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून, २०२१ रोजी जाहीर करून बक्षिस वितरण करण्यात येईल.

५. या अभियांनांतर्गत खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील:

**(अ) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी :**

| | | |
|---|---|---|
| (१) | अमृत शहर | गुणानुक्रमा नुसार प्रथम येणारी ३ अमृत शहरे |
| (२) | नगरपरिषदा | गुणानुक्रमा नुसार प्रथम येणाऱ्या ३ नगरपरिषदा |
| (३) | नगरपंचायती | गुणानुक्रमा नुसार प्रथम येणाऱ्या ३ नगरपंचायती |
| (४) | ग्राम पंचायती | गुणानुक्रमा नुसार प्रथम येणाऱ्या ३ ग्राम पंचायती |

**(ब) स्थानिक स्वराज्य संस्थांना अभियानात काम करण्यास प्रोत्साहीत केल्याबाबत विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी :**

| | | |
|---|---|---|
| (१) | सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विभागाचे विभागीय आयुक्त | १ |
| (२) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी | ३ |
| (३) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष | ३ |

**(क) जिल्हास्तरावर उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या प्रत्येकी एका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस व ग्राम पंचायतीस प्रोत्साहनात्मक बक्षिस देण्यात येईल.**

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाव उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२०१०१४१७२७४२१८०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SURYAKANT KISAN NIKAM

(सु.कि.निकम)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति :

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री, नगर विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री, नगर विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज,यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३) विभागीय आयुक्त (सर्व)
१४) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१५) जिल्हाधिकारी (सर्व)

| (ब-१) ग्राम पंचायती : २४६<br>१०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असेलेल्या ग्राम पंचायती | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | ग्राम पंचायतीचे नाव |
| २२५ | बुलढाणा | देऊळगाव माही |
| २२६ | बुलढाणा | सगवान |
| २२७ | बुलढाणा | वडनेर |
| २२८ | बुलढाणा | मलकापूर (ग्रामीण) |
| २२९ | बुलढाणा | धामणगाव बधे |
| २३० | बुलढाणा | पिंपळगाव काळे |
| २३१ | बुलढाणा | धड |
| २३२ | बुलढाणा | आमदापूर |
| २३३ | बुलढाणा | सोनाला |
| २३४ | बुलढाणा | देऊळघाट |
| २३५ | बुलढाणा | साखर खेरडा |
| २३६ | बुलढाणा | पिंपळगाव राजा |
| २३७ | बुलढाणा | डोणगाव |
| २३८ | वाशिम | अनसिंग |
| २३९ | वाशिम | शिरपूर |
| २४० | यवतमाळ | विदुल |
| २४१ | यवतमाळ | धानकी |
| नागपुर विभाग | | |
| २४२ | भंडारा | सेंदुरवाफा |
| २४३ | चंद्रपूर | भिसी |
| २४४ | गडचिरोली | अल्लापल्ली |
| २४५ | नागपूर | खरबी |
| २४६ | नागपूर | कोंढाळी |
| २४७ | वर्धा | नाचनगाव |